


सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर



सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, बुधवार पेठ येथील अस्थिविहार ,कौन्सिल हॉल येथील महापौर कार्यालयात प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

| Volume | III | Issue | 11 | Date | 16-05-2024 |
|---|---|---|---|---|---|

मुंबई घाटकोपर वडाळा येथे जे होर्डिंगच्या दुर्घटना घडली आहे. त्या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे शहरातील होर्डिंग असोसिएशन पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीस उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, विक्रम पाटील तसेच होर्डिंग असोसिएशनचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते. शहरातील अधिकृत व अनाधिकृत होर्डिंग यांची तपासणी करण्यात येणार असून महापालिकेच्या माध्यमातून शहरातील सर्व होर्डिंगचे सर्वे करण्यात येणार आहे. प्रत्येक होर्डिंगचे पुनःश्च स्ट्रक्चरल ऑडिट तपासून घेण्यात येईल. शहरात ज्या ठिकाणी जुन्या इमारतींवर होर्डिंग लावलेले आहेत अशा जुन्या इमारतींचे देखील स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. शहरात अनेक ठिकाणी होर्डिंग लागले आहेत होर्डिंग लावण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेची परवानगी घ्यावी लागते जे होर्डिंग अशा परवानगी न घेता लावलेल्या आहेत त्यांच्यावरती कारवाई करण्यात येईल. तसेच सध्या वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊस सुरू असून या वादळामध्ये होर्डिंग पडणार नाहीत,नागरिकांच्या नुकसान होणार नाही. जीवित हानी होणार नाही. याची दक्षता घ्यावी या सर्व नियमावलीचे काटेकोरपणे पालन करावे असे सूचना महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी संबंधित होर्डिंग असोसिएशनयांना दिले.

